


RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६१ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## संसदेत उपराष्ट्रपतींचा अपमान पाहून वाईट वाटलं; राष्ट्रपती

### राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षाच्या खासदाराच्या कृत्याचा केला निषेध

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेचे हिवाळी अधिवेशन सध्या दिल्लीत सुरू आहे. मात्र १४१ खासदारांच्या निलंबनानंतर दिल्लीत राजकीय वातावरण तापलं आहे. मंगळवारी संसदेत निलंबित केलेले टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांनी राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांची नक्कल केली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यावरून सत्ताधारी भाजपाने विरोधकांना घेरले आहे. त्यात आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



विरोधी पक्षाच्या खासदाराच्या कृत्याचा निषेध केला आहे.

संसदेत उपराष्ट्रपतींचा अपमान चुकीचा आहे असं राष्ट्रपतींनी म्हटलं तर मंगळवारी सभागृहात सभापतींनीही नाराजी व्यक्त केली. पंतप्रधान मोदींनीही विरोधी खासदाराच्या या कृत्यावर आक्षेप घेतला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, संसदेच्या परिसरात उपराष्ट्रपतींचा ज्याप्रकारे अपमान झाला ते पाहून मला खूप वाईट वाटले. निवडून आलेले प्रतिनिधींना स्वत:ला अभिव्यक्त करण्यास स्वतंत्र असले पाहिजेत, परंतु त्यांची अभिव्यक्ती सन्मान आणि सौजन्याच्या निकषांमध्ये असावी. हीच संसदीय परंपरा आहे ज्याचा आम्हाला अभिमान आहे आणि भारतातील लोक ते कायम राखतील अशी अपेक्षा आहे असं त्यांनी एक्सवर सांगितले.

तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही जगदीप धनखड यांना फोन करून खेद व्यक्त केला.मागील २० वर्षापासून माझाही असाच अपमान मी पाहत आलोय. परंतु देशाचे उपराष्ट्रपती पदासारख्या घटनात्मक पदावर बसलेले असताना आणि तेदेखील संसद भवनात असे कृत्य होणं दुर्दैवी आहे असं मोदींनी म्हटलं. त्यावर काही लोकांच्या अशा प्रकारामुळे मला माझे कर्तव्य निभावण्यापासून आणि आपल्या संविधानाचे रक्षण करण्यापासून कुणी रोखू शकत नाही. मी संविधानाच्या मूल्यांवर चालण्यास कटिबद्ध आहे. त्यामुळे हे अपमान मला माझ्या मार्गापासून चालण्यास विचलित करू शकत नाहीत असं धनखड यांनी पंतप्रधानांना म्हटलं.

## नीतीश कुमारांच्या बदलत्या भूमिकेमुळे सोनिया गांधी हैराण; 'इंडिया' आघाडीत टेन्शन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

मंगळवारी इंडिया आघाडीची राजधानी दिल्लीत बैठक झाली. यात विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार, राजद सुप्रीमो लालू प्रसाद यादव, उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांचा सहभाग होता. या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली.परंतु नीतीश कुमार यांना संयोजक बनवण्यावर कुठलाही निर्णय झाला नाही. त्यामुळे पत्रकार परिषदेआधीच नीतीश कुमार, लालू प्रसाद यादव निघून गेल्याची चर्चा आहे. आता एका इंग्रजी वृत्तपत्राने सूत्रांच्या हवाल्याने मोठी बातमी दिली आहे. ज्यानुसार नीतीश कुमार यांनी इंडियाऐवजी भारत नाव चांगले असल्याचे म्हटलं आहे.



इंडिया आघाडीच्या बैठकीत नीतीश कुमार यांनी म्हटलं की, देशाला भारत नावानेच ओळखले पाहिजे. नीतीश कुमारांचे हे विधान अशावेळी आलं जेव्हा भाजपा आधीपासून देशाचे नाव अधिकृतपणे भारत ठेवण्याचा विचार करत आहे. नीतीश कुमार यांचे विधान ऐकून सोनिया गांधी हैराण झाल्या. कारण नीतीश कुमार पुन्हा एकदा इंडिया आघाडीच्या भूमिकेविरोधात जातानाचे चित्र दिसत आहे.टाइम्स न्यूजनं ही बातमी दिली. त्यामुळे नीतीश कुमार यांचा इंडिया आघाडीत मोहभंग झालाय का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नीतीश कुमार यांनी भलेही मला कुठल्याही पदाची लालसा नाही असं म्हटलं असले तरी त्यांच्या मनात निश्चितच जर आपण विरोधकांना एकजूट करत असू तर त्याचा लाभ झाला पाहिजे अशी इच्छा आहे. त्यामुळे कदाचित इंडिया आघाडीच्या या बैठकीपूर्वी बिहारमध्ये नीतीश कुमार पंतप्रधानपदाचे मुख्य चेहरा म्हणून बिहारमध्ये पोस्टरबाजी झाली होती. मात्र बैठकीत असा कुठलाही अजेंडा चर्चेला आला नाही ज्याची नीतीश कुमार यांच्या जदयूने अपेक्षा केली होती.

## जब शनि महाराज की लाठी चलती है तो आवाज नहीं होता; आरोपानंतर फडणवीसांचे कडक शब्दांत आदेश

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अहमदनगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थान संस्थेतील कथित भ्रष्टाचारावरून गंभीर आरोप केले जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. जब शनि महाराज की लाठी चलती है तो आवाज नहीं होता, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी चौकशी केली जाणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. विश्वस्त मंडळाच्या नोकर भरती, देणगी स्वीकारण्याची पद्धत, इत्यादीबाबत सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल. चौकशीनंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसंच श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त व्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम २०१८ या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा दिनांक निश्चित करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असं फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितलं आहे.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शनैश्वर देवस्थानच्या संदर्भातील सदस्यांनी मांडलेले विषय गंभीर आहेत. आवश्यक नसताना १८०० जणांची नियुक्ती करण्यात आल्याचे दिसून येते. देवस्थानमध्ये कर्मचारी भरतीच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध केली नाही. तसंच देणगी गोळा करण्यासंदर्भातही तक्रारी असून या यासंदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी चौकशी केली आहे. मात्र, ही चौकशी पुरेशा प्रमाणात करण्यात आली नाही. तसेच या चौकशीत विसंगती आहे. त्यामुळे शनैश्वर देवस्थानचे विशेष लेखापरीक्षणनंतर उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर शनिशिंगणापूर देवस्थानसंदर्भातही सन २०१८ मध्ये कायदा करण्यात आला. मात्र, त्याची अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नाही. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून लवकरात लवकर तो लागू करण्यात येईल, असंही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष आणि आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली. आमदार अनिल परब, कपिल पाटील, प्रवीण दरेकर, सतेज पाटील, प्रसाद लाड आदींनी या चर्चेत सहभाग घेतला.

## पीएम मोदींनी लोकांकडून सरकार अन् खासदारांचे रिपोर्ट कार्ड मागितले


### निवडणुकीसाठी महत्वाचे मुद्देही विचारले

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

२०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांनी तयारी सुरु केली आहे. भाजपनेही जोरदार तयारी केली असून आता पंतप्रधान नरेंद्र मोदी एका सर्वेद्वारे आपल्या सरकारचे रिपोर्ट कार्ड मागवणार आहेत. या सर्वेक्षणाद्वारे पंतप्रधानांना त्यांच्या सरकारच्या सर्व योजना, त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामांचा आणि खासदारांचा आढावा घ्यायचा आहे, जेणेकरून निवडणुकीतील आश्वासने आणि खासदारांना जनतेच्या इच्छेनुसार सादर करता येईल. विविध मुद्द्यांवर जनतेचे मत एकत्रित करण्यासाठी नमो ॲप हे पंतप्रधानांसाठी अतिशय प्रभावी माध्यम ठरले आहे. यापूर्वीही पंतप्रधानांनी या ॲपद्वारे जनतेकडून मत मागवले आहेत.

नमो ॲपवरील जनमन सर्वेक्षणात एकूण १३ प्रश्न विचारण्यात आले आहेत. पहिला प्रश्न मोदी सरकारच्या एकूण कामगिरीबाबत विचारण्यात आला आहे. दुसरे म्हणजे भविष्याबद्दल आशावाद. तिसरा म्हणजे जगातील भारताच्या वाढत्या उंचीबद्दल जनमत जाणून घेणे. चौथ्या प्रश्नात लोकांना मोदी सरकारच्या पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, रोजगार, शेतकरी समृद्धी, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, राष्ट्रीय सुरक्षा, अर्थव्यवस्था, महिला सक्षमीकरण, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत, कायदा या क्षेत्रातील कामगिरीचे मूल्यांकन करण्यास सांगितले आहे. आणि सुव्यवस्था आणि शहरी विकास. तुम्ही त्याबद्दल किती समाधानी आहात?, असं विचारण्यात आले आहे.

पाचवा प्रश्न म्हणून केंद्र सरकारच्या कोणत्या योजनांचा लोकांना वैयक्तिक फायदा झाला, याची माहिती मागवण्यात आली आहे. यामध्ये पंतप्रधान गरीब कल्याण योजना, स्वच्छ भारत



मिशन, आयुष्मान भारत योजना, आयकर स्लॅब, वंदे भारत, मेट्रो आणि नमो भारत ट्रेन, जन औषधी केंद्र, पीएम जन धन योजना, डिजिटल इंडिया, जल जीवन मिशन, पीएम आवास योजना, स्टार्टअप इंडिया यांचा समावेश आहे. , उज्ज्वला. योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, मुद्रा योजना, पोषण अभियान, स्टँडअप इंडिया आणि स्किल इंडियाचा पर्याय देण्यात आला आहे.

तुमच्या क्षेत्रातील तीन लोकप्रिय नेत्यांची नावे सांगा यानंतर सर्व प्रश्न खासदारांच्या प्रतिक्रियांशी संबंधित आहेत. सहावा प्रश्न खासदाराच्या मतदारसंघात राहतो की नाही, हा आहे. सातव्या प्रश्नात खासदारांना परिसरात सुरू असलेल्या कामांची माहिती आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला आहे. खासदारांच्या कामावर जनता समाधानी आहे का? नववा प्रश्न खासदारांच्या लोकप्रियतेबाबत विचारण्यात आला आहे. यासोबतच मतदारसंघातील तीन लोकप्रिय नेत्यांची नावे विचारण्यात आली आहेत.याद्वारे आता भाजप लोकांचे जनमत जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

## आदित्य ठाकरे नर्सरीचा मुलगा, नितेश राणे यांची टीका

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

नागपूरात हिवाळी अधिवेशन आहे, नर्सरीची शाळा नव्हे. त्यामुळे नर्सरीच्या पोरांबद्दल मला प्रश्न विचारू नका, असे म्हणत आमदार नितेश राणे यांनी विधानभवन परिसरात प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना आदित्य



ठाकरेंना टोला लगावला. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पत्रकारांनी आदित्य ठाकरेंच्या १४ दिवसांच्या कामावर प्रश्न विचारला असता राणे म्हणाले, संजय राऊत आज इव्हीएम आणि व्हीपॅटवर आक्षेप घेत आहेत. तुमचा नेता साधा ग्रामपंचायत इलेक्शन देखील निवडून येऊ शकत नाही. शिवसेनेचे जेव्हा १८ खासदार निवडून आले तेव्हा इव्हिएममध्ये दोष नव्हता का? आता मोदींचा हात डोक्यावरून निघताच एकही खासदार निवडून येणार नाही, याची धास्ती त्यांना बसली आहे. त्यामुळे इव्हिएमवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.त्याच बरोबर खरगे पंतप्रधान पदाचे उमेदवार असावेत, यासाठी आम आदमी पार्टी आणि ममता बॅनर्जींनी समर्थन दिले. पण उद्धव ठाकरे असे समर्थन न देताच महाराष्ट्रात परतले.




## सरकारचा नंदीबैल म्हणतो, नाही नाही; विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्य सरकारचा निषेध केला

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

हिवाळी अधिवेशनाच्या काळात एकाही घटकाचा प्रश्न सुटला नसल्याची टीका करीत विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर राज्य सरकारचा निषेध केला. हाताला काळ्या पट्ट्या बांधून यावेळी सरकारविरोधी घोषणा देण्यात आल्या. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनिल देशमुख, बाळासाहेब थोरात, रोहित पवार, वैभव नाईक, राजन साळवी, रवींद्र धनगेकर यांच्यासह इतर आमदार या निषेध आंदोलनात सहभागी झाले होते. '

हिवाळी अधिवेशनाच्या काळात जनतेचे कोणतेच प्रश्न राज्य सरकारला सोडविता आले नाहीत. शेतकऱ्यांना मदत मिळाली का, पेपरफुटीवर कडक कायदा झाला का, परीक्षा फी कमी झाली का, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न सुटले का, आशा सेविकांचे प्रश्न सुटले का, कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना न्याय दिला का, कर्मचारी भरती सुरू झाली या सगळ्या प्रश्नांचे उत्तर 'नाही' असेच असल्याची टीका या विरोधी पक्षाच्या आमदारांनी केली. 'प्रश्न कोणताही विचारा, या सरकारचा नंदीबैल म्हणतो नाही, नाही', ' खासदार निलंबनाचा निषेध असो', ' राज्य सरकारचा धिक्कार असो', अशा वेगवेगळ्या घोषणा देऊन विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्य सरकारचा निषेध केला.

## भारतातील विद्यार्थ्यांकडे जगातील सर्वात मोठं प्रतिभेचं भांडार : पंतप्रधान नरेंद्र मोदी

### पि. आर. पोटे पाटिल अभियांत्रिकी महाविद्यालयातील हॅकाथॉन स्पर्धकांशी साधला संवाद

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्मार्ट इंडिया हॅकाथॉनच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर आवृत्तीच्या महाअंतिम फेरी देशभरात ४७नामांकित महाविद्यालयात हि स्पर्धा संपन्न होत आहे भारत सरकार व एआयसीटी ने विदर्भातील पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाची स्पर्धे करिता निवड केली असून २३ मंत्रालयांच्या २३१ समस्या सोडवण्याबरोबरच तंत्रज्ञानाचाही





शोध स्पर्धेत घेतला जाणार आहे. यामध्ये १२ हजार स्पर्धक सहभागी होत आहेत. प्रत्येक विजेत्या संघाला प्रति समस्या विधान १ लाख रुपये रोख बक्षीस दिले जाईल.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याकरिता स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२३ च्या महाअंतिम फेरीत पी. आर.पोटे पाटील महाविद्यालया तील सहभागी स्पर्धकांसह देशभरातील स्पर्धकांशी संवाद साधला, विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले की, मी दिवसभर स्मार्ट इंडिया हॅकाथॉन चे अपडेट्स घेतले. तुम्ही सर्वजण स्मार्ट इंडिया हॅकाथॉनमध्ये खूप मेहनत घेतात, पण मला शिकण्याची संधीही मिळते. ते म्हणाले की, म्हणूनच जेव्हा जेव्हा स्मार्ट इंडिया हॅकाथॉन असते तेव्हा मी तुम्हा सर्वांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. पुढे बोलताना ते म्हणाले कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक गतिमान समस्या आहे आणि लोकांना नवीन तंत्रज्ञानाबद्दल सतर्क राहावे लागेल. ते असेही म्हणाले की तंत्रज्ञान हा अभूतपूर्व पद्धतीने जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे आणि भारताने ते आयात करू नये किंवा त्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नये. 'भारतात जगातील सर्वात मोठा टॅलेंट पूल आहे आणि जगाला विश्वास आहे की भारत जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी कमी किमतीत, गुणवत्तापूर्ण, शाश्वत आणि सर्वसमावेशक उपाय देऊ शकतो.' 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन'च्या महाअंतिम फेरीच्या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, 'तंत्रज्ञान हा अभूतपूर्व पद्धतीने आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे, भारताला कोणतेही तंत्रज्ञान आयात करण्याची गरज नाही, हे आमचे उद्दिष्ट असले पाहिजे. यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. भविष्यामध्ये भारताची उत्पादकता वाढवण्यासाठी सेमीकंडर आणि चिप टेक्नोलॉजीमध्ये भारत आत्मनिर्भर होईल व्यक्त केले तसेच या स्पर्धेमध्ये रेल्वे वॅगन मध्ये तंतोतंत कोळसा भरणे, मुलांचे मानसिक रोगाचे निदान करणे, कुठल्याही भाषेचे कुठल्याही भाषेत ऑडिओ द्वारे भाषांतरीत करणे या सारख्या प्रमुख समस्येवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना निरासन करण्याचे आवाहन केल

## मेळघाटातील आदिवासीआपल्या समस्या घेवून पोचले शासनाच्या दारी

**दि२०विदर्भ प्रजासत्ताक**

**चिखलदरा** – सध्या राज्य शासन शासन आपल्या दारी हा कार्यक्रम राबवत आहे .मात्र आमच्यापर्यंत गेल्या ७५ वर्षांमध्ये शासन कधीच पोहोचलं नाही, असा आरोप करत आज मेळघाटातील आदिवासी लोक आपल्या विविध विभागाच्या समस्या घेऊन थेट शासनाच्या दारी पोहोचले. व संपूर्ण त्यांच्या समस्येचा त्यांनी अधिकाऱ्यांसमोर पाढाच वाचून दाखवला. सरकारने आमच्या आदिवासींयाना फसवलं, आमचे मूलभूत अधिकार आम्हाला दिले नाही.

## संपादकीय ......

# निवडणूक जनतेसाठी की पक्षासाठी!

मुंबई उच्च न्यायालयाने परवा पुण्यातील पोटनिवडणुकीसंदर्भातील याचिकेवर सुनावणी करताना या लोकसभा मतदारसंघात तात्काळ निवडणूक घेण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले आहेत. उच्च न्यायालयाने दिलेला हा आदेश खरेतर लोकप्रतिनिधी कायद्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण असाच आहे, परंतु पुणे लोकसभा पोटनिवडणूक घेण्यासाठी आवश्यक वेळच टळून गेल्याने या निर्णयाचे गांभीर्य हवेत विरून गेले आहे, अन्यथा प्रसारमाध्यमांनी केलेल्या बातमीच्या पलीकडे किमानपक्षी पुणे लोकसभा मतदारसंघातील जनतेने तरी या निर्णयाची दखल घेतली असती, मात्र सध्याच्या घडीला याचिकाकर्त्याशिवाय ही पोटनिवडणूक झाली काय किंवा न झाली काय याचे कुणालाही सोयरसुतक दिसत नाही.

भाजप खासदार गिरीश बापट यांचे २९ मार्च २०२३ रोजी निधन झाले होते. तेव्हापासून पुणे लोकसभा मतदारसंघाची जागा रिक्तच आहे. लोकसभा २०२४ निवडणुकीच्या तयारीसह इतर निवडणुकांमध्ये व्यग्र असल्याने तसेच पुणे पोटनिवडणूक झाली तरी निवडून आलेल्या प्रतिनिधीला कमी कालावधी मिळेल, अशी दोन कारणे देत केंद्रीय निवडणूक आयोगाने ही पोटनिवडणूक घेण्यास नकार दिला. हे सरळ सरळ लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन नाही तर काय? पुण्यातील एक जागरूक रहिवासी सुघोष जोशी यांनी पुणे मतदारसंघात पोटनिवडणूक न घेण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीचे वारे देशात वाहू लागले आहेत. सत्ताधारी भाजपसह सर्व राज्यातील सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागलेत. त्याचप्रमाणे केंद्रीय निवडणूक आयोगानेही लोकसभेची तयारी सुरू केल्यास नवल वाटण्याचे कारण नाही, मात्र एका बाजूला लोकसभा निवडणुकीआधी निवडणूक आयोग मध्य प्रदेश (२३०), राजस्थान (१९९), तेलंगणा (११९), छत्तीसगड (९०) आणि मिझोराम (४०) अशा ५ राज्यांतील ६७८ जागांसाठी निवडणूक घेऊन दाखवते, परंतु पुण्यातील एकमेव जागेवर पोटनिवडणूक घेण्याचे धाडस दाखवत नाही हा तर्क पटण्याजोगा नाही. आगामी लोकसभा निवडणूक एप्रिल ते मे २०२४ दरम्यान होणे अपेक्षित आहे. त्यानुसार एप्रिल २०२३ मध्ये जरी पुणे लोकसभा पोटनिवडणूक झाली असती तरी येथील लोकप्रतिनिधीला किमान वर्षभराचा कालावधी मिळाला असता, परंतु तसे झाले नाही. मुंबई उच्च न्यायालयानेदेखील निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर टिप्पणी करताना आयोगाचा हा निर्णय विचित्र आणि संबंधित मतदारसंघातील लोकांवर पूर्णपणे अन्याय करणारा असल्याचे म्हटले आहे.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल खट्टा यांच्या खंडपीठाने पुणे मतदारसंघातील जनतेला जास्त काळ प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवता येणार नाही, असेदेखील नमूद केले आहे. कोणत्याही संसदीय लोकशाहीत जनतेचा आवाज असलेले निवडून आलेले लोकप्रतिनिधी शासन करतात. निवडून आलेला प्रतिनिधी हयात नसेल तर त्याच्या जागी दुसरा प्रतिनिधी नियुक्त करावा. निवडणूक आयोगाची भूमिका पूर्णपणे असंवैधानिक असून आपल्या घटनात्मक संरचनेचा हा अपमान असल्याचे भाष्य उच्च न्यायालयाने केले. दुर्दैवाने उच्च न्यायालयाच्या या टिप्पणीचा निवडणूक आयोगावर काही परिणाम होईल असे दिसत नाही. कारण या निर्णयाविरोधात निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी करत असल्याचे म्हटले जात आहे. शिवाय लोकसभा निवडणुकीसाठी ६ महिन्यांहून कमी कालावधी शिल्लक राहिल्याने तांत्रिकदृष्ट्यादेखील पुण्यात पोटनिवडणूक होण्याची शक्यता धुसरच आहे

# माडीझडप गाव अजूनही काळोखातच

## रस्ता नाही, वीज नाही, शिक्षणाचाही अभाव



**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट** जगाने विविध क्षेत्रात मोठी प्रगती केली. सगळीकडे विकासाचे मोठे स्वप्न उभे राहिले. डिजिटल युग तसेच इतर क्षेत्रात सुद्धा मोठ्या प्रमाणात प्रगती झाली असली तरी मेळघाटातील दुर्गम भागातील गावांमध्ये अजूनही वीज पोहचलेली नाही. पक्का रस्ता सुद्धा नाही. अशा खितपत पडलेल्या मेळघाटातील माडीझडप गाव अजूनही काळोखातच असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

चिखलदरा तालुक्याच्या ठिकाणापासून या गावाचे अंतर ७० ते ७५ किलोमीटर असून सेमाडोह हे गाव ओलांडले की माखला मार्गे चुनखडी, खडीमल व नंतर खडीमलवरून आठ किलोमीटर कच्च्या रस्त्यातून अतिशय खडतर प्रवास माडीझडप गावातील नागरिकांना लाभला आहे. पावसाळ्यात हा रस्ता बंद होतो म्हणजेच या रस्त्यांवरून मोटरसायकल सुद्धा चालत नाही अशी भयावह परिस्थिती या गावाची आहे. या रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यांमध्ये रस्ता आहे कळत नाही, परंतु आदिवासी बांधव यालाच रस्ता म्हणतात. गावाची लोकसंख्या ३०० ते ४०० च्या जवळपास आहे. १०० कुटुंब या गावात राहतात. गावाच्या चारही बाजूने घनदाट जंगल असून या गावातील नागरिकांचे मुख्य व्यवसाय शेती व शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गुरे पालन तसेच रोजगार हमी योजनेची कामे व वन विभागामार्फत मिळणारी रोजगार हमी योजनेची कामे, असे आहे.

गावामध्ये मधोमध सोलरवर चालणार्या पाण्याच्या दोन टाक्या बसवल्या आहेत; मात्र त्या पाण्याच्या टाक्या फक्त उभ्या आहेत. त्यामध्ये पाणी कधीच पोहोचले नाही. खालून पाईप सुद्धा कटलेले आहेत. गावामध्ये कोणीतरी सात-आठ वर्षा अगोदर सोलरचे लाईट लावले होते; मात्र आजघडीला एकही सोलरचे स्ट्रीट लाईट चालू नाही. त्यामुळे सायंकाळी सातच्या नंतर गावामध्ये सगळीकडे शुकशुकाट असतो. गावाच्या आजूबाजूने जंगली प्राणी सतत फिरत असतात. त्यामुळे जंगली प्राण्यांचा सुद्धा नागरिकांना धोका आहे. मागच्या वर्षी अस्वलीने ६० वर्षीय केंडे तान्या बेठेकर यांच्यावर हल्ला केला होता. गावात कोणी आजारी असले तर या कच्च्या रस्त्यावरून वरून आठ किलोमीटर खडीमलपर्यंतचा अतिशय खडतर प्रवास करत जावे लागते. गावात एक ते पाचपर्यंत वर्ग आहेत, मात्र पुढील शिक्षणासाठी मुलांना आश्रमशाळेशिवाय पर्याय नाही. दहावी किंवा बारावीच्या पुढे गावात कोणीच शिकलेला नाही. दोन शिक्षकी शाळा आहे, त्यातही एक शिक्षक नेहमीच गायब असतो.

# ब्राम्हणवाडा भगत येथे संकल्प यात्रेला विरोध

## सरपंचावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

### भाजपाची पोलिस अधीक्षकांकडे धाव



**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** अमरावती तालुक्यात येणार्या ब्राम्हणवाडा भगत येथे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व कर्मचारी यांनी पदाचा गैरवापर करून केंद्र सरकारचा विकसीत भारत संकल्प यात्रेचा मोदी गॅरंटी रथाला विरोध करून तो गावातून बाहेर काढल्याची घटना उघडली आहे. यात सहभागी असणार्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपाने पोलिस अधीक्षकांकडे केली आहे. भाजपा ओबिसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रदेश कार्यकारणी सदस्य रविराज देशमुख यांच्या नेतृत्वात भाजपाचे नितीन किटुकले, निलेश निचित, गजानन रहाटे, प्रफुल खंडार यांनी मंगळवारी पोलिस अधीक्षक आनंद यांची भेट घेऊन निवेदन दिले व कारवाईची मागणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकसित भारत संकल्प यात्रा रथ गावोगावी गोरगरीब जनतेपर्यंत योजनांची माहिती देत आहे. सरकारच्या नियोजनानुसार गावातील ग्रामपंचायत व मुख्य ठिकाणी योजनांची चित्रफित दाखविणे अपेक्षित आहे. असे असातना १८ डिसेंबरला ब्राम्हणवाडा भगत येथे सकाळी ११ वाजता आलेल्या रथाला ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी विरोध केला. रथाची गाडी चालविणार्या चालकाला जीवे मारण्याची व शासकीय गाडी तोडफोड करण्याची धमकी दिली. सदर शासकीय वाहन गावाच्या बाहेर हाकलून लावण्यात आले. गावकर्यांना केंद्र सरकारच्या योजनेपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाला. शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. पोलिस काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विचोरी येथील बाभूळ बनातील जुगारावर धाड

## सात जुगारी ताब्यात, शिरखेड पोलिसांची कारवाई



**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक रिद्धपुर-** विचोरी येथील बाभूळच्या बनात सुरू असलेल्या जुगारावर शिरखेड पोलिसांनी सोमवार, १८ डिसेंबर रोजी रात्री धाड टाकली. या कारवाईत सात जुगाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून १ लाख ८७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

विचोरी येथील बाभूळच्या बनात मोठ्या प्रमाणात जुगार भरल्याची माहिती शिरखेड पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी या जुगारावर धाड टाकली. या कारवाईत शेख अहेमद शेख लाल (४२) रा. रिद्धपूर, उमेश रमेश भगणे (२३) रा. सुलतानपुरा, मोर्शी, दीपक चंपत हेले (५८) रा. रोहनखेड, नईम शाह शब्बीर शाह (३८) रा. परतवाडा, पिंटू दामोदर हरबास (३९) रा. विचोरी, कैलास नामदेव लाकडे (३६) रा. विचोरी, संदीप आवराव नेरकर (२९) रा. रोहनखेड यांना ताब्यात घेण्यात आले, तर दोन जुगारी पसार झालेत. ताब्यात घेण्यात आलेल्या जुगाऱ्यांकडून रोख रक्कम, दुचाकी व मोबाइल असा एकूण १ लाख ८७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई शिरखेडचे ठाणेदार सूरज तेलगोटे यांच्या नेतृत्वात संजय वाघमारे, नितेश वाघ, राहुल सुडे, अरुण श्रीनाथ यांनी केली.





# सांधेदुखीच्या रुग्णांनी हिवाळ्यात 'या' चुका करू नये; नाहीतर हाडांवर होईल परिणाम

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

आर्थरायटिस हा हाडांशी संबंधित आजार आहे, ज्यामध्ये गंभीर दुखणे आणि हात, पाय आणि शरीराच्या इतर सांध्यांना सूज येणे यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. सांधेदुखी हा साधारणपणे वयोमानानुसार होणारा आजार मानला जातो. परंतु, योग्य आहारामुळे शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले की, सांध्यामध्ये क्रिस्टल्स जमा होतात, त्यामुळे लहान वयातही सांधेदुखी होऊ शकते. सांधेदुखीचा त्रास असलेल्या रुग्णांनी हिवाळ्यात विशेष काळजी घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही काही चुका केल्या तर परिस्थिती आणखी बिघडू शकते आणि तुम्हाला सांधेदुखीचा त्रास सहन करावा लागू शकतो.



हिवाळ्याला सुरुवात झाली आहे. या हवामानात वातावरण खूप थंड असते आणि त्यामुळे सांधेदुखीचा त्रास तुम्हाला अधिक त्रास देऊ शकतो. अनेक वेळा सामान्य रोजच्या दिनश्चर्येतील काम करतानाही लोकांना त्रास होतो. त्यामुळे सध्याच्या हिवाळ्यात सांधेदुखी टाळण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

**सतत एकाच जागी बसणे**

जर तुम्हाला सांधेदुखीचा त्रास होत असेल तर एका जागी जास्त वेळ बसणे टाळा. कारण हिवाळ्यात सामान्य लोकांनाही शरीरात जडपणा येतो, तर तुम्हाला संधिवात असेल तर वेदना लक्षणीय वाढू शकतात. यामुळे एकाच जागी जास्त वेळ बसू नका.

**थंड पाण्याचा वापर**

हिवाळ्यात हवामान खूप थंड असते, त्यामुळे वेदना वाढू शकतात. त्याच वेळी, जर तुम्ही थंड पाण्याने काम करत असाल किंवा अंघोळीसाठी थंड पाण्याचा वापर केला तर वेदना, सूज आणि जडपणाची समस्या आणखी वाढू शकते. यासाठी थंड पाणी वापरू नका.

**'या' गोष्टी टाळा**

सांधेदुखीच्या रुग्णांनी हिवाळ्यात आहाराची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे. जास्त साखर, कॅफीनयुक्त पदार्थ (चहा-कॉफी), अस्वास्थ्यकर चरबीयुक्त पदार्थ, शुद्ध पदार्थ इत्यादींचे सेवन करणे टाळा. नाहीतर सांधे सुजणे आणि वेदना होऊ शकतात. त्याच वेळी, तुम्ही व्हिटॅमिन डी समृद्ध पदार्थांना तुमच्या आहाराचा भाग बनवा. यासाठी तुम्ही डॉक्टरांचा सल्लाही घेऊ शकता. असे केल्याने तुम्हाला त्रास होणार नाही.

# यंदा पणन महासंघाला कापूस खरेदी करण्याची अजूनही परवानगी नाही

## कापसाचे दर पडतीवर शेतकऱ्यांमध्ये चिंता

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** गत आठवड्यात ७ हजार १०० रुपयांवर असलेला कापसाचा भाव खुल्या बाजारात मंगळवार, १९ डिसेंबर रोजी ६ हजार ८०० रुपयांपर्यंत खाली आला. यंदा पणन महासंघाला कापूस खरेदी करण्याची परवानगी मिळाली नसताना सीसीआयचेही केंद्र सुरू झाले नाही, त्यामुळे, स्पर्धा नसल्याने त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या कापसाला कमी दर मिळण्यात होऊ लागला आहे.

कापूस पणन महासंघाने प्रयत्न करूनही सरकारने खरेदीची परवानगी

दिलेली नाही. सलग दुसऱ्या वर्षी महासंघास परवानगी नाकारण्यात आली आहे. सीसीआय कापूस खरेदी करणार असल्याचे सांगण्यात येत असले, तरी हंगाम संपत आला असतानाही सीसीआयचे केंद्र सुरू होऊ शकलेले नाही. शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कापूस विकावा लागत आहे. या बाजारात कापसाला मिळणाऱ्या दरात



सातत्याने घसरण होत आहे. गेल्या सोमवार, ११ डिसेंबर रोजी खुल्या बाजारात कापसाला ७ हजार ते ७ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल भाव होता सरासरी ७ हजार ५० रुपये भाव मिळाला एका आठवड्यात मंगळवारी ३०० रुपयांची त्यामध्ये घसरण झाली असून कापर्साला ६ हजार ७७५ रुपये सरासरी भाव मिळाला.

कापसापासून शेतकऱ्यांना खूप अपेक्षा होती. यावर्षी कापसाचे दर १० हजारांवर जातील, या अपेक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या आशेवर मात्र बाजारात घसरत असलेल्या दरांमुळे पाणी फेरल्या जात आहे.त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरात कापूस अजूनही पडून आहे.

# ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती - अमरावती जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. ३१ डिसेंबर २०२३ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# एकाच घरातील सहा चिरडले, तिघांचा जागीच मृत्यू तिघे जखमी

## जुन्या वादातून घडली घटना




**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर –** जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. दर्यापूर तालुक्यातील नाचोना यागावात वास्तव्य करत असणाऱ्या सामान्य गरीब कुटुंब आज रात्री आठ वाजताच्या सुमारास आपल्या अंगणात गप्पागोष्टी करत होते. त्याचवेळी त गावातील अवैधपणे दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीने जुन्या वादातून रागाच्या भरात त्यांचे चारचाकी वाहन चक्क घराच्या अंगणात आणून वृद्ध आणि महिलांच्या अंगावर घातले. या घटनेत तीन जण जागीच ठार झाले असून अन्य तीन गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दर्यापूर तालुक्यातील खल्लार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या नाचोना या गावात हा भयंकर प्रकार घडला आहे. या घटनेनं सर्वत्र अफरातफरीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच अमरावती जिल्हा शिवसेनाप्रमुख गोपाल अरबट आणि त्यांची चमु गावात पोहीचल्याने पुढील अनर्थ टळला. घटनास्थळावरून तातडीने संबंधित जखमी आणि मृत लोकांना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात तातडीने भरती केले आहे. या घटनेनं संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. ही घटना जुन्या वादातून झाली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

यात्रकारातील आरोपी चां दारूचा व्यवसाय नाचोना या गावांमध्ये अवैधपणे सुरू होता. खल्लार पोलीस याकडे दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप मृतकाच्या मातेवाईकांनी यावेळी केला. आज सायंकाळी ८ वाजताच्या दरम्यान हा प्रकार घडला आहे. गंभीर जखमींना तातडीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले असून मृतकांना शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे. या घटनेत अनुसया शामराव अंभोरे (६७), शामराव लालूजी अंभोरे (७०), अनारकली मोहनगुजर (४३) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. तर शारदा उमेश अंभोरे (४०), उमेश अंभोरे (४०), किशोर शामराव अंभोरे (३८) हे जखमी झाले आहेत. दर्यापूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार संतोष ढाले आणि त्यांच्या चमूने उपजिल्हा रुग्णालयातर भेट दिली असून पुढील तपास दर्यापूर पोलीस करीत आहे.

## पिवळ्या हेल्मेटमध्ये कॅमेरा, राम मंदिर परिसरात फेरफटका; एका संशयिताला अयोध्येत अटक

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या** अयोध्येत राम मंदिराचे काम वेगाने सुरू आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी रामलल्ला प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान मोदी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी केली जात आहे. मात्र, राम मंदिर परिसरातून एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. या व्यक्तीने पिवळ्या रंगाचे हेल्मेट घातले होते आणि या हेल्मेटला कॅमेरा लावण्यात आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, राम मंदिर परिसरात गेट क्रमांक १० वर तैनात असलेल्या एका सुरक्षा रक्षकाने दुचाकीवर फिरणाऱ्या दोन जणांना हटकले. चौकशी केल्यानंतर या दोघांना राम जन्मभूमी पोलिसांच्या हवाली करण्यात आले. या दोघांची पोलिसांनी तसेच विविध गुप्तचर यंत्रणांनी कसून चौकशी केली.

छत्तीसगडमधील रहिवासी असलेल्या भानू पटेल हा यलो झोनमध्ये दुचाकीवरून फिरत होता. त्याच्या हेल्मेटवर कॅमेराही लावण्यात आला होता. हे पाहून रामजन्मभूमीच्या गेट क्रमांक १० वर तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी थांबवले आणि त्याची झडती घेतल्यानंतर पोलिसांच्या ताब्यात दिले. वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि अनेक गुप्तचर यंत्रणांनी रामजन्मभूमी पोलीस स्थानकात त्यांची चौकशी केली. तपासात मिळालेल्या माहितीनुसार, पटेल हा इंडिया मॅप कंपनीचा कर्मचारी आहे. पटेल सर्वेक्षणाच्या कामासाठी आला होता. अद्याप कंपनीला यासाठी परवानगी मिळालेली नाही. सध्या पोलीस आणि गुप्तचर यंत्रणा चौकशी करत आहेत.

## २२ डिसेंबरला सर्वांत लहान दिवस, रात्र सर्वांत मोठी!

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** २२ डिसेंबरला सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे राहील या बिंदूला 'विंटर सोल्स्टाईस' असे म्हणतात या बिंदूवर सूर्य असताना दिवस हा वर्षातला सर्वांत लहान व रात्र ही सर्वांत मोठी असते. दिवस हा १०.४७ तासांचा राहील. या दिवसाला दर वर्षांत थोडा फरक पडू शकतो, अशी माहिती खगोलतज्ज्ञांनी दिली.

दिवस व रात्रीचा कालावधी कमी-जास्त होणे आपण नेहमीच अनुभवत असतो. पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कललेला असल्याने हे घडत असते व याचाच परिणाम म्हणून सूर्याचे उत्तरायन व दक्षिणायान सुद्धा आपल्याला अनुभवता येते. कोणत्याही वस्तूच्या पडणाऱ्या सावलीचे निरीक्षण केल्यास सूर्याचे उत्तरायन व दक्षिणायान सहज लक्षात येते. पृथ्वीवरील ऋतू देखील पृथ्वीच्या कलत्या अक्षामुळे निर्माण होतात.

सर्व खगोलप्रेमींनी या लहान दिवसांचे प्रत्यक्ष कालमापन करावे व या दिवसाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.



### सूर्य दक्षिणेकडे जास्त असल्याचा परिणाम

१) आकाशात वैषुविक व आयनिक व या दोन वृत्ताचे दोन काल्पनिक छेदनबिंदू आहेत. यापैकी एका बिंदूत २३ सप्टेंबर रोजी सूर्य प्रवेश करतो, याला 'शरद संपात बिंदू' असे म्हणतात. तर त्याचे विरुद्ध बिंदूत २३ सप्टेंबरला सूर्य प्रवेश करतो. याला शरद संपात बिंदू म्हणतात.

२) या दोन्ही दिवशी दिवस व रात्रीचा कालावधी हा सारखाच असतो. २२ डिसेंबरला सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे असतो. या बिंदूवर सूर्य असताना दिवस हा वर्षातला सर्वांत लहान व रात्र सर्वांत मोठी असते. या दिवसाला 'हिवाळा अयन दिवस' देखील म्हणतात.

# कडाक्याच्या थंडीने जनजीवन विस्कळले

## अमरावती चा पारा ९ अंश

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक** –मागील आठवडाभरा पासून थंडीचा जोर वाढतच चालल्याचे दिसत आहे. विशेषम्हणजे, आता दिवसा ऊन व सायंकाळी थंडीहा प्रकार थांबला असून, दिवसभर गार वारे सुटल्यामुळे गरम कपड्यांशिवाय वावरणे कठीण होत आहे.

त्यातही मंगळवारी (दि. १९) पारा चांगलाच कोसळला असून, किमान तापमानाची ९ अंशांवर नोंद घेण्यात आली. यंदाचे हे सर्वात कमी तापमान ठरले असून, गोंदिया व अमरावती व यवतमाळ जिल्हा विदर्भात पहिल्या क्रमांकावर होते. डिसेंबर महिना लागूनही पाहिजे तशी थंडी पडली नसल्याने हिवाळ्याचा काही अंदाज जिल्हावासीयांना येत नव्हता. सकाळी व सायंकाळी थंडीचा जोर वाढत होता; मात्र दिवसा उन्हामुळे पाहिजे तसा हिवाळा जाणवत नव्हता. मात्र,



रात्री लवकरच शुकशुकाट थंडीचा जोर वाढू लागल्यामुळे रात्रीला आता फिरणाऱ्यांची गर्दी कमी झाल्याचे दिसत आहे. नागरिक आपली कामे आटोपून आतालवकरचघरात शिरत असल्यामुळे रात्रीला लवकरच रस्त्यांवर शुकशुकाट होत आहे. त्यातही जे बाहेर दिसतात ते शेकोटीच्या अवतीभवती घोळका करून असतात. विशेष म्हणजे, ग्रामीण भागात थंडी जास्त जाणवत असल्याने आता शेकोट्या पेटू लागल्या आहेत.

मागील आठवडाभरापासून थंडीचा जोर दिवसेंदिवस वाढताना दिसला. आठवड्या भरापासून पारा १२ ते १३ अंशांदरम्यान वरखाली होत होता. मात्र, मंगळवारी (दि. १९) पार चांगलाच घसरला असून, किमान तापमान थेट अंशांवर आले होते. यंदाचे हे सर्वात कमी तापमान ठरले. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील मागील एक-दोन दिवसांपासून गार वारे सुटले असून, त्यामुळेही जिल्हावासीयांना हुडहुडी भरू लागली आहे. मंगळवारी गोंदिया व यवतमाळ जिल्हा विदर्भात पहिल्या क्रमांकावर होता.

# २० गावठी दारूच्या हातभट्यांवर छापा, ५.४३ लाखांचा माल जप्त

## महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमेवरील जंगलात पोलिसांची कारवाई



**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** जिल्ह्याचे सिमेवरील मध्यप्रदेश राज्यातील परिसरात गावठी हातभट्टी दारू निर्मिती व ग्रामीण भागात होत असलेली वाहतुकीच्या घटना गत काही महिन्यात समोर आल्या आहेत. अशातच महाराष्ट्र व मध्यप्रदेश सिमेवर असलेल्या अमरावती जिल्ह्यातील बहिरम येथील यात्रा २० डिसेंबर पासून सुरू होत आहे.

या दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याचे दृष्टीने मंगळवार १९ डिसेंबर रोजी शिरजगांव पोलिस,स्थानिक गुन्हे शाखा व मध्यप्रदेशातील भैसदही पोलिसांच्या संयुक्त पथकाने दोन्ही राज्याच्या सिमा परिसरात गावठी दारू विरूध्द विशेष मोहीम राबवून भैसदही हद्दीतील खोमई येथील जंगल परिसरात पोलिसांच्या संयुक्त पथकाने धाडसत्र राबवून अवैध दारू अडयावर धडक कारवाई केली आहे. भैसदही व अमरावती पोलिसांच्या संयुक्त कारवाईत २० गावठी दारूच्या हातभट्टया नष्ट केल्या आहेत.यात १९८ टयुब मध्ये प्रत्येकी ५० किलो प्रमाणे कच्चा मोहा किंमत ४ लाख ९५ हजार रूपयाचे तसेच २९ ड्रममध्ये मोहा सडवा किंमत ४८ हजार रूपये असा एकूण ५ लाख ४३ हजार रूपायचा गावठी हातभट्टी दारू गाळण्याचे साहीत्य व मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधिक्षक विशाल आनंद,अपर पोलिस अधिक्षक विक्रम साळी,एसडीपीओ अतुलकुमार नवगीरे,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे,सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार,प्रविण वेरूळकर,तसेच महेंद्र गवई, पोलिस अंमलदार तसेच भैसदही प्रभारी अधिकारी अंजना धुर्वे,व अंमलदार यांनी संयुक्त कारवाई केली आहे.

# मेळघाटात ग्रामसडक योजनेचा बोजवारा

## आठच महिन्यात रस्त्याचा निकाल

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक धारणी–** व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलाच्या सीमेवरील लाक्टू बंबईढाणा ते बिबामल सडक मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत यावर्षीच्या मार्च अखेरच बांधण्यात आली. मात्र नऊ महिन्यापूर्वीच सडक जागोजागी उखडलेली असल्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा बोजवारा उडाल्याच्या प्रतिक्रिया आदिवासीं मधून उमटत आहेत. मेळघाटात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत अनेक रस्ते डांबरीकरण करण्यात आलेले आहे. मात्र, निकृष्ट काम तथा कमी शक्तीच्या रोलरने दबाई करण्यात आल्याने केवळ आठ ते नऊ महिन्यातच सडक उखडून खराब झालेली आहे. धारणीपासून २२ कि. मी. अंतरावरील बंबईढाणा ते लाक्टू बिबामल मार्ग एकूण ९ कि. मी. उन्हाळ्यात बांधण्यात आला. ही सडक पॅकेज क्रमांक एएमआर ९७ अंतर्गत ६५०. ९८ लक्ष रुपयाने बांधण्यात आलेली होती. मात्र बांधकाम अत्यंत निकृष्ट तथा कमी वेळेत करण्यात आल्याने सडकेचे तीनतेरा झालेले आहे. नवीन सडकेतून ठिकठिकाणी डांबरासहित गिट्टी बाहेर आलेली आहे. दुचाकींचे अनेक अपघात या मार्गावर होत आहे. रस्ता पूर्ण झाल्यावर पुढील पाच वर्षाची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी ठेकेदाराची आहे खरे, परंतु काम करण्यासाठी तीन महिन्याचा उशीर करण्यात आला म्हणजे गॅरंटी काळातील तीन महिने वाया गेले.

एका माहितीनुसार, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अमरावतीमार्फत ज्योती कन्स्ट्रकश्न कंपनीकडून ९ कि. मी. ची सडक बांधण्यात आलेली असून प्रत्यक्ष डांबरीकरण होत असताना एकही तांत्रिक अधिकारी किंवा अभियंता उपस्थित नव्हता, हे विशेष!



सडकेजवळ लावलेल्या माहिती फलकावर पूर्ण माहिती लिहिण्यात आलेली नसल्याने बांधकामाची गुणवत्ता ओळखण्याचा मार्ग बंद झालेला आहे. बंबईढाणा ते बिबामल रस्त्याची दुर्दशा सध्या धारणी तालुक्यात चर्चेचा विषय आहे. ज्योती कंपनीचा संपर्क पत्ता किंवा फोन नंबर नसल्याने तक्रार कोणाला करावी, असा पेचप्रसंगी आदिवासींसमोर उभा आहे. जंगलातील बांधकाम कोणी पाहात नाही, असा समज संबंधितांचा आहे.

# मनपा अधिकारी गायब, युकाँचे खुर्चीला माल्यार्पण

## वडाळी प्रभागामधील साफसफाई अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करा

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** वडाळी प्रभागात कचऱ्याच्या संदर्भात युवक काँग्रेसने मंगळवारी महापालिका अधिकाऱ्यांना निवेदन देण्याचा प्रयत्न केला, मात्र निवेदन स्वीकारण्याकरिता अधिकारी कक्षात नसल्याने कार्यकर्त्यांनी खुर्चीला माल्यार्पण करून प्रशासनाच्या नावे निवेदन दिले.

विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख यांनी सांगितले की, स्वच्छ भारत स्वच्छ शहर अंतर्गत अमरावती महानगरपालिकेला पुरस्कार मिळाला. त्या पुरस्काराचा स्वच्छता मोहिमेकरीता मोठा गाजावाजा केला. मात्र शहराची

आजची परिस्थिती पाहिली तर प्रत्येक परिसरामध्ये कचऱ्याचे ढीग बघायला मिळत आहेत. जिकडे तिकडे अस्वच्छता दिसून येत आहे. शहरातील वडाळी प्रभागात स्वच्छता नक्की होते कुठे, अशा प्रश्न पडत आहे. वडाळी प्रभागातील शहरातील मुख्य नाल्याची सुरुवात वडाळी प्रभागामधून होते. त्या नाल्यात कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत आहेत. नागरीकांना दुर्गंधीचा त्रास होत असून आरोग्यासही धोका निर्माण झाला आहे.

वडाळी प्रभागातील नाला त्वरीत स्वच्छ करून त्या भागातील नागरीकांना आरोग्यास कोणतीही बाधा होणार

नाही, याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची असून ती जबाबदारी योग्यरीतीने पार पाडत नसल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख यांच्यासह



माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, प्रदेश सचिव योगेश बुंदेले, उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, सचिव आकाश धुराटकर, एनएसयुआय अध्यक्ष संकेत साहु, अमोल डोंगरे, श्रेयस धर्माळे, आकाश खडसे, आशिष किल्लेवाले, कृष्णा गुगलमाने, मोहित भेंडे, निखील बिजवे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नरेंद्र मोदींनी जोपासले देशहीत : महंत सत्येंद्रदास

## विकासाचा मार्ग पंतप्रधानांनी केला प्रशस्त

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीराम मंदिर बांधले म्हणून



ते पुन्हा सत्तेत येणार असे नाही तर त्यांनी जम्मू काश्मीरचे कलम ३७० रद्द केले, तेथील जनतेला सुखसुविधा पुरविल्या. तीन तलाकचा कायदा रद्द केला. देशातील महागाई, बेरोजगारी संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला. जगात देशाची प्रतिष्ठा वाढवून विकासाचा मार्ग प्रशस्त केल्याने पुन्हा देशात भाजपाची सत्ता येईल आणि नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होतील, असा अशावाद अयोध्येतल्या श्रीराम जन्मभूमीची २८ वर्ष अखंड सेवा करणारे महंत सत्येंद्रदास महाराज यांनी केले.

अमरावतीत सुरू असलेल्या पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथावाचनात सहभागी होण्यासाठी ते अमरावतीत आले असता त्यांनी समाजसेवक चंद्रकुमार जाजोदीया यांच्या घरी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी हनुमान गढी अयोध्या येथील मुख्य महंत राजुदास महाराज, विहिंपचे पदाधिकारी, अनिता जोजोदीया उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, भाजपने आपल्या निवडणूक जाहिर नाम्यामध्ये देशात राम मंदिर बांधणार असे स्पष्ट केले होते. पंतप्रधान मोदी हे श्रीरामाचे भक्त आहेत. त्याच आशीर्वादाने ते सत्तेवर आहेत. मध्यंतरी ज्या राजकीय पक्षातील लोकांनी श्रीरामाला काल्पनिक म्हटले होते ते सर्व आज रस्त्यावर आले आहे. श्रीरामावर श्रद्धा ठेवून त्यांच्या मार्गावर चालणार्यांना निश्चितच यश प्राप्त होते, असे सत्येंद्रदास म्हणाले.

### २२ जानेवारीला देशभर दिवाळी

पाचशे वर्षाच्या लढ्यानंतर आज अयोध्येत श्रीरामाचे मंदिर बनले आहे. या मंदिराशी भाविकांच्या भावना जुळल्या आहे. २२ जानेवारीला रामललाची प्राणप्रतिष्ठापणा होणार आहे. त्या दिवशी निश्चितच संपूर्ण देशात दिवाळी साजरी होईल, असे सत्येंद्रदास म्हणाले.

### अमरावती आणि अयोध्येची एकच रास

अमरावती म्हणजे अमर लोकांची नगरी आणि आमची आयोध्या म्हणजे कोणीही युद्धात हरवू शकत नाही अशी भूमी. अमरावती आणि आयोध्या या एकाच राशीत येतात आणि दोन्ही शहरांचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व फार मोठे असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# सिने कलावंत मोहन जोशी अंबादेवीत...



अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच जेष्ठ सिने कलावंत श्री मोहन जोशी यांनी सपत्नीक मंगळवारी श्री अंबादेवीचे दर्शन घेतले या वेळी मंदिराचे विश्वस्त श्री पांडे यांच्या वतीने त्यांचा शाल ,श्रीफळ देत सत्कार करण्यात आला.

# रानडुकराचा शेतकऱ्यावर हल्ला

## नांदरून शिवारातील घटना

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नांदरून भामोद :** शेतात काम करीत असलेल्या एका शेतकऱ्यावर रानडुकराने हल्ला केला. त्यात शेतकरी गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवार, १९ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास नांदरून शिवारात घडली. जखमी शेतकऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नाजुक बापुराव पवार (५५) रा. नांदरूण असे जखमीचे शेतकऱ्याचे नाव आहे. मंगळवारी सकाळी नाजुक पवार हे आपल्या शेतातील कपाशीच्या पिकातून रानडुकरांना हाकलून लावत होते. त्यावेळी अचानक रानडुकराने मागून त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अशोक पवार हे गंभीर जखमी झाले.

ही बाब शिवारातील अन्य शेतकऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. शिवारात रानडुकरांच्या वाढत्या संख्येने पिकांचे नुकसान होत आहे. सोबतच हल्ल्याच्या घटनाही घडत आहेत. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. त्यामुळे वन विभागाने रानडुकरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नांदरून येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

## शिक्षणमहर्षी बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम

**दि२१ विदर्भ प्रजासत्ताक पापळ–** डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिक्षणमहर्षी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवार, २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र, पापळ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

गरजू लोकांना वेळेवर रक्त मिळत नाही. त्यामुळे शिक्षणमहर्षी संस्थेच्या वतीने वेळोवेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्याच पार्श्वभूमीवर भाऊसाहेबांच्या



जयंतीचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात परिसरातील दात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन शिक्षणमहर्षी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा वर्षा मनोहर वानखडे व सामाजिक कार्यकर्ते मनोहर वानखडे यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील १२ सोसायट्या, पतसंस्थांच्या निवडणुका घोषित

## २१ जानेवारीला होणार मतदान, नामांकन स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** जिल्ह्यातील १२ सोसायट्या आणि पतसंस्थेच्या निवडणुका सहकारी प्राधिकरणा कडून जाहीर करण्यात आल्या आहेत. याकरिता १९ ते २६ डिसेंबरपर्यंत नामांकन स्वीकारले जाणार आहे. तर २१ जानेवारीला मतदान होणार आहे. यामध्ये अमरावती तालुक्यातील ९ तर वरूड तालुक्यातील ३ सोसायट्यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील उर्दू एज्युकेशन असोसिएशन कर्मचारी सहकारी पतसंस्था मां, अमरावती, ऑफिस एम्प्लॉइज क्रेडिटको-ऑप सोसायटी लिमिटेड अमरावती, पाणीपुरवठा कामगार सहकारी पतसंस्था, अमरावती, जिल्हा सामान्य रुग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्था, अमरावती, शासकीय तंत्रनिकेतन कर्मचारी सहकारी पतसंस्था अमरावती, न्यू एज्युकेशन सोसायटी कर्मचारी सह. क्रेडिट सोसायटी बडनेरा, अमरावती जिल्हा अभियंता क्रेडिट को- ऑप. सोसायटी अमरावती, अमरावती जिल्हा पटवारी सहकारी पतसंस्था अमरावती, अमरावती महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था अमरावती, इव्होल्युशन



म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह पतसंस्था जरुड, डेबूजी महाराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, वरुड, सरकारी-निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्था बरुड या १२ सोसायट्या आणि पतसंस्थेचा मतदारवादी कार्यक्रम यापूर्वी पार पडला. ४ डिसेंबर रोजी याची अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केल्यानंतर मंगळवारी निवडणुकी चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यामुळे मंगळवार पासून नामांकन स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून २६ डिसेंबर पर्यंत नामांकन स्वीकारले जाणार आहे. २७ ला नामांकना ची छाननी केल्यानंतर २८ डिसेंबर ते ११ जानेवारी दरम्यान नामांकन मागे घेण्या करिता मुदत देण्यात आली आहे. १२ ला निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून २१ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. त्यादिवशी मतमोजणीदेखील केली जाणार आहे.

# १५ उमेदवारांची रिंगणातून माघार

## आज शेवटचा दिवस, ५८ उमेदवार अद्यापही मैदानात

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ३१ डिसेंबर रोजी होऊ घातलेल्या निवडणुकीत तब्बल ७३ उमेदवार रिंगणात असताना यातून मंगळवारी १५ उमेदवारांनी मैदानातून माघार घेतली आहे. त्यामुळे १५ संचालकपदांकरिता अद्यापही ५८ उमेदवार रिंगणात कायम असल्याने बुधवारी शेवटच्या दिवशी यातून किती उमेदवार माघार घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीसाठी ४ डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये ८६ नामांकन दाखल झाले असताना छाननीदरम्यान १३ नामांकन अवैध ठरवित ७३ पात्र उमेदवारांची यादी ६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीत जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीत बँकचे विद्यमान उपाध्यक्ष राजेंद्र जाधव यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला. त्यामुळे या निर्णयाविरोधात राजेंद्र जाधव यांनी पुणे येथे सहकार आयुक्तांकडे अपील दाखल केली होती. यावर निर्णय देत उपनिबंधकाचा निर्णय रद्द करीत जाधव यांचा अर्ज कायम ठेवला होता. परंतु, सोमवारी विरोधकांनी सहकार आयुक्तांच्या या निर्णयाविरोधात नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली.

त्यामुळे उच्च न्यायालयाने सहकार आयुक्तांचा निर्णय रद्द करीत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांचा निर्णय कायम ठेवला आहे. अशात सोमवारपर्यंत ७३ उमेदवार रिंगणात असताना मंगळवारी यातून १५ उमेदवारांनी माघार घेतली. अद्यापही ५८ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात असल्याने बुधवारी नामांकन मागे घेण्याकरिता शेवटचा दिवस शिल्लक राहिला आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी यातून किती उमेदवार माघार घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धामक येथे बहिरम बाबा यात्रे निमित्त कुस्ती दंगल

## सुंशात पाटील कोल्हापूर ठरला विजेता

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर–** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धामक येथे श्री बहीरम बाबा यात्रेनिमित्त श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळाचे वतीने भव्य अश्या कुस्तीच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले होते या दंगली मध्ये संपूर्ण विदर्भातील नामांकित कुस्ती पटूनी आपली हजेरी लावली होती.याकुस्ती स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार प्रा.वीरेंद्र जगताप यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील हे होते.यावेळी वीरेंद्र जगताप म्हणाले की,मनुष्याच्या जीवनात खेळाचे महत्व हे अनन्य साधारण असून खेळ हे मनुष्याला निरोगी ठेवण्याचे काम करते कुस्ती हा मर्दानी खेळ असुन या खेळाकडे आज दुर्लक्ष केल्या जात असल्याने मोठ्या प्रमाणात युवकांनी या खेळाकडे वळले पाहिजे त्याच प्रमाणे शासनाने सुद्धा कुस्ती सारख्या मर्दानी मैदानी खेळांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. गावागावात कुस्ती पटू तयार झाले पाहिजेत असे मत प्रा.जगताप यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनोज कडु यांचेसह प्रतिष्ठित नागरिक प्रमोद कंठाळे, सुनिल केने, प्रा.सतिश खोडे, सरपंच जयदीप काकडे,प्रमोद कोहळे,रमेश ठाकरे,स्वराज ठाकरे,विष्णू तिरमारे,सुभाष मुळे, श्याम राऊत,गोकुळ राठोड अजगर पठान,अजय निर्मळ, प्रकाश दुधमोचन,दिनेश सोनकुसरे,या स्पर्धेत कोल्हापूर येथील कुस्तीपटू सुशांत सिंग राजपूत हा विजेता ठरला असल्याने त्याचेवर बक्षीसाचा वर्षाव करण्यात आला.त्याच प्रमाणे इतरही विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण भाजपाचे नेते हरिचंद्र खंडाळकर, घनश्याम सारडा, राजेश पाठक,प्रशांत वैद्य, अमोल धवस, दिलीप सोरते सुरेश वैष्णव,विजय झाडे, अरविंद निर्मळ,कमलचंद्र गुगलिया, अभिजीत तायडे यांचे



हस्ते करण्यात आले. या कुस्ती स्पर्धेत कुस्ती पंच म्हणून दत्ता पाटील रंनजित देशमुख ,शेख जाफर यांनी काम पाहिले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जमिर खॉ पठाण तर आभार प्रदर्शन प्रविण चौधरी यांनी केले.या कार्यक्रमाला नागरिकांनी आपली हजेरी लावली होती.

# रब्बी हंगामातील २५ टक्के पेरण्या अद्यापही शिल्लक

## गव्हाचे क्षेत्र वाढेना कांद्याचे क्षेत्र घटले

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** डिसेंबर महिना संपत आला असला, तरी रब्बी हंगामाच्या २५ टक्के पेरण्या अद्यापही शिल्लक आहेत. त्यात गव्हाचे क्षेत्र वाढले नाही. सोबतच हरभऱ्याचेही क्षेत्रही फार वाढू शकले नाही. रब्बी हंगामाच्या सरासरी १ लाख ४८ हजारपैकी १ लाख ९ हजार हेक्टर क्षेत्रात आतापर्यंत पेरणी आटोपली आहे. या वर्षी मान्सून उशिरा आल्याने पेरण्या विलंबाने



झाल्यात. त्यानंतर अतिवृष्टी व पावसाचा खंड, यामुळे खरिपातील पिकांवर परिणाम झाल्याने रब्बी हंगामात पेरणी क्षेत्र वाढण्याची अपेक्षा होती. मात्र, कृषी विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजातच पेरणी क्षेत्र कमी आहे. १ लाख ४८ हजार ८७९ हेक्टर इतके क्षेत्र रब्बी हंगामात पेरणी योग्य आहे. आतापर्यंत त्यापैकी १ लाख ९ हजार ४८४ हेक्टरमध्ये पेरणी आटोपली आहे. यातील बहुतांश क्षेत्र हरभऱ्याने व्यापले आहे. ८५ हजार ४१६ हेक्टरमध्ये हरभऱ्याची पेरणी झाली असून गव्हाचे क्षेत्र वाढ अपेक्षित करण्यात आले आहे. जिल्ह्यात जानेवारीपर्यंत गव्हाची पेरणी केल्या जाते. त्यामुळे गव्हाचे क्षेत्र वाढणार आहे.सिंचनाची सोय असलेल्या भागात गव्हाची पेरणी केल्या जाते, तर कमी पाण्यात येणाऱ्या हरभऱ्यास शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. मका व रब्बी ज्वारीची पेरणी अल्प प्रमाणात आहे. ज्वारीखाली ३३७ तर मक्याखाली ७९१ हेक्टर क्षेत्र आले आहे.

### उन्हाळी कांद्याचे क्षेत्र घटले

गावरानी किंवा उन्हाळी कांद्यासाठी अमरावती जिल्हा आघाडीवर आहे. दरवर्षी उन्हाळी कांद्याखाली मोठे क्षेत्र राहते. यंदा १४२२ हेक्टरमध्ये कांद्याची पेरणी झाली आहे. एप्रिल व मे महिन्यात हा कांदा बाजारात विक्रीसाठी येतो. तर १४५४ हेक्टरमध्ये भाजीपाल्याची लागवड झाली आहे.

# युरियासाठी शेतकऱ्यांची वणवण भटकंती

## गव्हाचे क्षेत्र वाढल्याने मागणी वाढली

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर :** तालुक्यातील शेतकऱ्यांना युरियासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. यंदा गव्हाचे पेरणी क्षेत्र वाढल्यामुळे युरियाची मागणीसुद्धा वाढली आहे.



कृषी केंद्रांमध्ये युरिया उपलब्ध आहे. पण शेतकऱ्यांना उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. गव्हाची पेरणी होऊन एक महिना झाला आहे. आता या पिकाला नत्राची गरज आहे. त्यामुळे बुरियाची फार आवश्यकता आहे. परंतु, शेतकऱ्यांना ते मिळत नसल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांनी पिकाला युरिया दिला नाही तर ते पिवळे पडून उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी युरियासाठी कृषी केंद्रामध्ये जात आहेत. परंतु, त्यांना युरिया उपलब्ध नाही, असे सांगितल्या जाते. विनवण्या करूनसुद्धा त्यांना रित्या हातीच परतावे लागत आहे. एखाद्या कृषी केंद्रामध्ये शेतकऱ्याने चार पोत्यांची मागणी केल्यास त्याला एक पोत देण्यात येते. परंतु, त्यासोबत एखादी दुसरी वस्तू घ्यावी लागेल, असे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, बारीक युरियाची गरज असताना शेतकऱ्यांना जाड युरिया विकत घ्यावा लागत आहे. या प्रकाराने शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. याकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

# विधिवत पूजा व रोडग्याचा नैवद्य दाखवीत आजपासून बहिरम यात्रेचा वाजला बिगुल

## दीड महिना चालणार यात्रा लाखो भक्तांची राहणार मांदियाळी

**दि२०विदर्भ प्रजासत्ताक बहीरम**

शेकडो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र बहिरम येथील दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विधिवत पूजाअर्चा करून यात्रेचा नारळ फोडण्यात आला.

दरवर्षी डिसेंबर महिन्यात बहिरम येथे पूजाअर्चा करण्यात येते. चंपाष्टमीचा मुहूर्त साधून याठिकाणी पूजा-अर्चेचा सोहळा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम बहिरम बुवाच्या मूर्तीला शेंदूर, दूध-दही, मध व लोण्याचा अभिषेक करण्यात आला...

विधिवत पूजेनंतर मंदिरासमोरील यज्ञात पूर्णाहुती देण्यात आली. होमहवन व त्यानंतर आरती करूनरोडग्याचा नैवद्य बहिरम बुवाला दाखवण्यात आला. त्यानंतर शंखनाद करून यात्रेचा नारळ फुटला.दरवर्षी या यात्रेला हजारो भाविक बहिरमबाबांच्या दर्शनाला येतात.



विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात ही यात्रा परिचित असल्याने भक्तमंडळी सलग दीड महिना या दर्शनाला येतात. संस्थांनच्या वतीने सोमवारी बहिरम बुवाच्या महापुजेला सुरवात झाली. शिवमंदिर, हनुमान मंदिर,महागणपती मंदिर याठिकाणी अभिषेक करण्यात आला. मोठ्या भक्तिमय वातावरणात याठिकाणी पूजा झाली. संपूर्ण सोहळ्याला संस्थांनचे अध्यक्ष सुरेंद्र चौधरी, सर्व विश्वस्त मंडळी त्याचप्रमाणे संस्थेचे व्यवस्थापक पिंटू ठाकरे व सुनील ठाकरे उपस्थित होते.

> सलग दीड महिना यात्रा भरणार आहे. संपूर्ण भक्तांमध्ये आनंदाचे व हर्षोल्हासाचे वातावरण आहे. महिला व पुरुषांची दर्शनाची वेगवेगळी व्यवस्था याठिकाणी करण्यात आली आहे. सर्व भाविकांनी शांततेने दर्शन घेऊ मंदिर संस्थेला व दर्शन समितीला सहकार्य करावे.
>
> **– सुरेंद्र चौधरी, अध्यक्ष, बहिरम बाबा संस्थान.**

# नक्षलवाद्यांचा गडचिरोलीत उच्छाद

## रस्ते बांधकामावरील वाहनांची जाळपोळ

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली**



भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम हिद्दुर गावात मध्यरात्री नक्षलवाद्यांनी रस्ते बांधकामावरील काही वाहनांची जाळपोळ केली. यावेळी त्यांनी पत्रक टाकले असून त्यात २२ डिसेंबर रोजी बंदचे आवाहन केले आहे. त्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे. जिल्ह्याच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या हीद्दुर- दोबुर आणि पुढे कोयरकोटी जोडणाऱ्या रस्त्याचे मागील काही दिवसांपासून बांधकाम सुरू आहे. बांधकामस्थळी असलेल्या वाहनांची नक्षलवाद्यांनी जाळपोळ केली. यात एक जेसीबी, टँकरचा समावेश आहे.

यावेळी पत्रक टाकून त्यांनी २२ डिसेंबर रोजी भारत बंद यशस्वी करा, असे आवाहन केले आहे. या संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी वृत्ताला दुजोरा दिला. विशेष म्हणजे, हा रस्ता पुढे छत्तीसगड राज्याला जोडणारा आहे. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या दहशतीत मागील अनेक वर्षांपासून प्रशासन या रस्त्याच्या बांधकामासाठी प्रयत्नरत आहे, तर नक्षल्यांचा या बांधकामाला विरोध आहे.

# जिल्ह्यातील दृष्काळसदृश गावात उपाययोजना लागू

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील ज्या महसूली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत तालुक्याच्या सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाला आहे, अशा महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आले आहे. त्यापैकी जिल्ह्यातील ७९ महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला असून त्या ठिकाणी विविध सवलती लागू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जाहिर केले आहे. दि. १० नोव्हेंबर २०२३ शासन निर्णयानुसार बाधित महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित केला आहे अशा गावांत दुष्काळावर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाव्दारे पुढीलप्रमाणे आठ प्रकारच्या सवलती लागू करण्यात आल्या आहे.जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जांचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५ टक्के सूट, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहिर केलेल्या गावात शेतकर्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे आदी सवलती दुष्काळग्रस्त गावांना लागू राहतील.

# कौशल्य विकासच्या उपसंचालक व्यवसाय शिक्षण पदभरतीत आदिवासींना 'नो एंट्री'

## उपसंचालक गट अ पदासाठी अर्ज भरण्याचा कालावधी २० डिसेंबरपासून ते ९ जानेवारी २०२४ पर्यंत

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उपसंचालक, व्यवसाय शिक्षण गट-अ तांत्रिक (वरिष्ठ), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गातील सहा पदांच्या भरतीकरिता ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. मात्र उपसंचालक गट-अ पदाच्या सहा जागा असलेल्या या जाहिरातीमध्ये आदिवासींकरिता एकही जागा आरक्षित ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे बेरोजगार आदिवासी उमेदवारांना या पदभरतीत 'नो एन्ट्री' असाच निर्णय घेण्यात आला आहे.

> सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय २९ मार्च १९९७ अन्वये अनुसूचित जमातीचा बिंदू २ क्रमांकावर होता. त्यावेळी ४ पदे असताना १ पद जमातीसाठी राखीव राहायचे. कालांतराने ७ जानेवारी २०१९ व २१ ऑगस्ट २०१९ अन्वये अनुसूचित जमातीचा बिंदू ४/६ स्थानावर गेला. त्यामुळे ६/८ पदे राखीव असल्यावरच १ पद अनुसूचित जमातीला मिळेल, अशी परिस्थिती जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आली आहे. ही बाब घटनाबाह्य व आरक्षण कायद्याविरोधी आहे.
>
> **– ॲड. प्रमोद घोडाम, संस्थापक अध्यक्ष ट्रायबल फोरम.**

उपसंचालक गट अ पदासाठी अर्ज भरण्याचा कालावधी २० डिसेंबरपासून ते ९ जानेवारी २०२४ पर्यंत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात क्र. ३९७ /२०२३ असून सदर जाहिरात १५ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध झाली आहेत. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाची राज्यस्तरीय 'जवान' पदभरतीमध्ये ५६८ पदांपैकी केवळ तीनच पदे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव (३४ पदे), सिंधुदुर्ग (३० पदे), यात सहायक प्राध्यापक भरतीमध्ये एकही पद आदिवासीकरिता राखीव नाही. या बाबी 'लोकमत'ने उजेडात आणलेल्या आहेत अन् त्यापाठोपाठ आता उपसंचालक, व्यवसाय शिक्षण गट-अ पदांच्या भरतीमध्ये आदिवासी समाजाकरिता एकही पद राखीव नसून आरक्षणात कपात दिसत आहे.

# समृध्दी महामार्गावर नागरिकांकडुन २५ मेणबत्ती लावून अनोखे आंदोलन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक सिंदखेड राजा**

तालुक्यातील पिंपळखुटा गांवाजवळ १ जुलै रोजी समृध्दी महामार्गावर विदर्भ ट्रॅव्हल्सचा अपघात होवुन २५ प्रवाशांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला होता. समृद्धी महामार्गाच्या अपघाताला पाच महिने उलटून गेलेत. मात्र अद्यापही सरकारकडून मदत न मिळाल्याने मृतांच्या नातेवाईकांनी वर्धा येथे आंदोलन सुरू केले.



त्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून सिंदखेडराजा येथील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकरी व इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी अपघातस्थळी जाऊन १९ डिसेंबरच्या मध्यरात्री २५ मेणबत्या पेटवून मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण केली. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सरकारने जाहीर केलेली मदत तत्काळ देण्यात यावी, यासाठी वर्धा येथील आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातामध्ये २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला होता, या भयंकर घटनेने अवघा महाराष्ट्र हादरुन गेला होता. समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातग्रस्त प्रवाशांना मदत व मृत व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी ड. संदीप मेहेत्रे, शेख यासिन, बुधू चौधरी, खलील शेख यांच्यासह स्थानिक नागरिकांनी मदत केली होती.

त्याच स्थानिक नागरिकांनी १९ डिसेंबर रात्री आगळे वेगळे आंदोलन केल्याचे पाहायला मिळाले. या अपघातात मृत्यू झालेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना शासनाकडून अद्याप कोणतीच मदत मिळाली नाही. याच पाश्वभूमीवर सरकारला जागे करण्यासाठी समृद्धीवरील अपघात स्थळी अनोखे आंदोलन करण्यात आले आहे.

यावेळी ड संदीप मेहेत्रे यांनी सांगितले की, अपघात झाल्यानंतर अपघात स्थळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्री खासदार आमदार या ठिकाणी येऊन अपघात स्थळाची पाहणी केली होती. त्यांच्या नातेवाईकांची भेट घेऊन मदत जाहीर केली होती. परंतु ती मदत अद्यापही मिळाली नाही.

व संबंधित ट्रॅव्हल्स मालकाकडून मदत मिळाली नसल्यामुळे वर्धा येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व मृत लोकांच्या आत्म्याला शांती लाभावी यासाठी २५ मेणबत्त्या लावुन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच शासनाकडून तात्काळ मदतीची मागणी यावेळी त्यांनी केली

# कोणी शिक्षक देता का शिक्षक? कडाक्याच्या थंडीत पालकांचे अर्धनग्न आंदोलन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक वाशीम**

मंगरुळपीर शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल येथे ५ ते १२ चे वर्ग भरतात. मात्र येथे शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. त्यामुळे तत्काळ शिक्षक देण्यात यावे, या मागणीसाठी पालकांनी ऐन कडाक्याच्या थंडीत अर्धनग्न ठिय्या आंदोलन पुकारले आहे.



सध्या जिल्ह्यातील बहुतांश जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

शाळेत मूलभूत सोई सुविधाचा अभाव आहे. मात्र, अशाही परिस्थितीत गोरगरिबांची मुले जिल्हा परिषद शाळेत शिकत आहेत. मंगरुळपीर शहरात जिल्हा परिषद हायस्कूल आहे. येथे ५ ते १२ चे वर्ग भरतात. शहरांसाह ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. मात्र येथे मोठया प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे हताश झालेल्या शिक्षकांनी थेट पंचायत समिती समोर ऐन कडाक्याच्या थंडीत अर्ध नग्न ठिय्या आंदोलन पुकारले आहे. एकीकडे जिल्हा परिषद हायटेक होत असताना जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागत आहे.

# स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचे गाडगे बाबा पुण्यतिथीनिमित्त स्वच्छता मोहीम

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नांदगाव पेठ १५ नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या हस्ते गाडगे बाबांच्या प्रतिमेला




हरार्पण करून गाडगेबाबांना वंदन करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांनी 'स्वच्छ भारत स्वस्थ भारत' या अभियानांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गोविंद तिरमनवार, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनिता बाळापुरे, सहकार्यक्रमाधिकारी डॉ.सुभाष पवार, डॉ. पी. आर. जाधव, दिलीप पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला. त्यानंतर गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील सर्व परिसर स्वच्छ केला. या ठिकाणी नांदगाव पेठ येथील समाजसेवक श्री. बंडू सुंदरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गाडगेबाबांनी दिलेला स्वच्छतेचा संदेश याचे कायम स्मरण करीत विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात स्वच्छतेला विशेष महत्त्व द्यावे असा महत्वपूर्ण संदेश श्री. बंडू सुंदरकर यांनी याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना दिला. या स्वच्छता मोहिमेत महाविद्यालयातील प्रा. राजेश ब्राह्मणे,डॉ.श्रीकांत माहुलकर, डॉ. विकास अडलोक, डॉ. पंकज मोरे, श्री ज्ञानेश्वर बारस्कर, रेखा पुसतकर, दिलीप पारवे,विनायक पावडे, अनिल शेवतकर, राहुल पांडे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक कु.सपना धर्माळे, दुर्गेश्वरी वंजारी प्रज्वल फुके, ओम शेंदरकर, श्रीकांत गाडे, ईश्वरी अटाळकर, धनश्री दुर्गे, सुष्मिता पुरी, साक्षी डुकरे, योगेश शेंदरकर, गायत्रीसावरकर, निहारिका डोईफोडे, वैष्णवी गायकवाड, समीक्षा मोरे उत्साहाने सहभागी झाले.

# कौन्सिलिंग अँडसायकोथेरपीत सुवर्णा मुने विद्यापीठातुन प्रथम

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संचालित आजीवन व विस्तार विभाग अंतर्गत येणाऱ्या कॉन्सिलिंग अँड सायकोथेरपी या पदवी अभ्यासक्रमामध्ये (९.२०) गुणांक घेऊन प्रथम मेरिट येण्याचा बहुमान अचलपूर येथील अभिनव कॉलनीतील रहिवाशी सौ. सुवर्णा राहुल मुने (बुटे) यांनी पटकावला असून



त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. त्या आपल्या यशाचे श्रेय आपल्या कुटुंबीयांना तसेच आपल्या सहपाठींना देतात. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून समाजसेवा व्हावी अशी त्यांची इच्छा आहे.

# कडाक्याच्या थंडीत लाखो भक्तांचे 'श्री शिवाय नमोस्तुभ्यं'....










हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टतर्फे हनुमानगढी येथे आयोजित पूज्य पंडित प्रदीप जी मिश्रा यांच्या पाच दिवसीय शिवमहापुराण सुरु आहे. कथेचा आजचा पाचवा दिवस होता. महाराष्ट्र राज्यासह सह इतर राज्यातील लाखो भाविक शिव कथेचा आनंद घेत आहे. आज शिवमहापुरण कथेचा शेवटचा दिवस असल्याने कथेचा वेळ सकाळी ८ ते ११ असा होता त्यामुळे हजारो भक्त हे कालच पेंडाल मध्ये मुक्कामी होते तर काही भक्त आज सकाळी ४ वाजल्यापासूनच हनुमान गढी कडे रवाना होतांना दिसून आले गेल्या दोन दिवसांपासून अमरावती जिल्ह्यात थंडीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असली तरी भक्ती समोर भाविक कशाचीही पर्वा न करता लाखो भक्तगणांनी आज सकाळीच कथेला हजेरी लावली तर रोज प्रमाणे आजही राणा दाम्पत्याने या कथेचा लाभ घेतला आयोजकांच्या वतीने अतिशय उत्कृष्ट व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली होती त्यामुळे लाखो भक्तगणांनी राणा दांपत्याचे आभार मानलेत. तर पोलिसांचा तगड़ा बंदोबस्त या ठिकाणी होता.

# पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२३ चे थाटात उद्घाटन

## ३६ तास अहोरात्र चालणार स्पर्धा : स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२३ आयोजनाकरिता पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाची भारत सरकार द्वारा निवड

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन द्वारे आयोजित स्मार्ट इंडिया हॅकाथॉनचे २०२३ चे उद्घाटन भारत सरकार , केंद्रीय शिक्षण मंत्रालय व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. विदर्भात एकमेव अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविघालयाची निवड भारत सरकार व –खउढए च्या वतीने करण्यात आली या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद ऑडीटोरियम येथे उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले असून येथे आयआयटी, आयआयएम, एनआयटी येथील उच्चतम विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून अहोरात्र ३६ तास विद्यार्थी भारत सरकार व पर्यावरण, वन आणि हवामान बदल केंद्रीय मंत्रालयाद्वारे प्रदान केलेल्या पाच समस्येचे निरासन करण्याकरिता प्रयत्न करणार आहेत.विदर्भात पहिल्यांदाच पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून उदयास आलेल्या तसेच केंद्रीय मंत्रालय व –खउढए द्वारा आयोजित स्मार्ट इंडिया हॅकाथॉनचे स्पर्धे करिता पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये तामिळनाडू , आंध्रप्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, तेलंगणा, त्रिपुरा, हरियाणा, पंजाब, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली विद्यार्थी पोहचले असून महाविद्यालयाच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करून या विद्यार्थ्यांना स्पर्धा जिंकण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येत आहे.पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यलयाच्या उच्चतम गुणवत्तेमुळे तसेच महाराष्ट्रात नॅक ए++ मानांकन प्राप्त असल्यामुळे या स्पर्धेच्या आयोजनाकरिता निवड झाली असल्याने हि अमरावतीकरांकरिता कौतुकास्पद व अभिमानाची बाब असून राष्ट्रीय पातळीवर अमरावतीचे नावलौकिक यामुळे वाढणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आज भारत सरकार , केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या हस्ते व अमरावतीच्या विभागीय आयुक्त माननीय डॉ निधि पांडे , पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयश दादा पोटे पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला.




शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलने स्पर्धे करीता महाविद्यालयात इंडस्ट्रीचे सीईओ,संचालक, नामवंत सायंटिस्ट यांना विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे आकलन करण्याकरिता परीक्षक म्हणून पाठविले आहे. स्मार्ट इंडिया हॅकाथॉन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना केंद्र सरकार मंत्रालय, विभाग उद्योग आणि इतर संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यावर या व्यासपीठाद्वारे उपाय शोधता येतील. स्मार्ट इंडिया हॅकाथॉन हे जगातील एकमेव सर्वात मोठे ओपन इनोव्हेशन मॉडल आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यामध्ये विविध सामाजिक, इंडस्ट्रियल, मानवी, पर्यावरण, हवाबद्दल व तसेच इतर समस्या सोडवण्याची संस्कृती रुजवली जाते. डखक सॉफ्टवेअर आणि डखक हार्डवेअर या दोन स्वरुपात उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी २०१७ पासून दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. संपूर्ण स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थी करणार असून यामध्ये कोडिंग क्लब , फोटोग्राफी क्लब, कल्चरल क्लब , कम्युनिकेशन क्लब चे विद्यार्थी यांचा सहभाग आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी अमरावती विभागीय आयुक्त डॉ निधि पांडे, पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील, एआयसिटी चे प्रतिनिधी आनंद कुळकर्णी, पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाचे संचालक डॉ डी. टी. इंगोले, डॉ मो. झुहेर, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दीपकजी धोटे, व्हीएमव्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ यावले, संयोजक डॉ झिशान खान, महाविद्यालयाचे सर्व डीन, सर्व विभाग प्रमुख व कमिटी मेंबर व स्पर्धा करिता आलेले विद्यार्थी उपस्थित होते.

# पोषण आहारातील स्वयंपाकी व मदतनीस यांच्यावर शासनाने टाकल्यात आठ जबाबदाऱ्या



**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

शाळेत पोषण आहाराचे काम करणाऱ्या स्वयंपाकी तसेच मदतनीस यांची कामे शासनाने निश्चित केली असून स्वयंपाकासह आठ जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत पोषण आहार देणारी पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजना लागू आहे. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती स्वयंपाकी व मदतनीस यांची नियूक्ती करते. केंद्र व राज्य शासन मिळून दर महिन्यास अडीच हजार रूपये मानधन दिल्या जाते. या दोन्ही कर्मचाऱ्यांना दिलेले काम पार पाडावे लागते. त्यात शाळा व शाळा परिसर स्वच्छ ठेवण्याची बाब नमूद आहे. मात्र हे काम योजनेशी संबंधीत कामकाजाखेरीज असल्याने कामगार संघटना त्याबाबत नाराजी व्यक्त करीत होत्या. तशी निवेदने शासनास देण्यात आली.

योजनेखेरीज अन्य कामे न देण्याची व या दोन्ही कर्मचाऱ्यांना कामावरून विनाचौकशी कमी न करण्याची मागणी सातत्याने होते. त्याची दखल घेत शासनाने आठ जबाबदाऱ्या पक्क्या केल्या आहे. तसेच स्वयंपाकी व मदतनीस यांच्या कामाविषयी काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यापूर्वी त्यांची बाजू समजून घेण्याची शासनाने सूचना केली आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी यांच्या परवानगीने पुढील कारवाई करण्याचेही सूचीत आहे.

### निश्चित केलेल्या जबाबदाऱ्या

१. पाककृतीनुसार ठरलेल्या वेळेत पोषण आहार शिजविणे.
२. तांदूळ तसेच अन्य धान्याच्या मालाची सफाई करणे.
३. विद्यार्थ्यांना जेवणाच्या जागेवर आहार वाटप.
४. आहार सेवन झाल्यानंतर जेवणाच्या जाग्यासह स्वयंपाकगृहाची सफाई व उर्वरीत अन्नाची विल्हेवाट.
५. आहाराच्या भांड्यांची तसेच ताटांची स्वच्छता.
६. पिण्याचे पाणी भरून विद्यार्थ्यांना वाटप करणे.
७. शाळेतील परसबाग निर्मिती व देखभालीसाठी सहकार्य.
८. आहारात वापरलेल्या भाजीपाला विषयक नोंदी ठेवणे.

# संत गाडगेबाबांना आज रात्री १२:२० वाजता वाहिली जाणार श्रद्धांजली

## हजारो अनुयायांची राहणार उपस्थिती

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

अखिल विश्वाला स्वच्छतेचा महामंत्र देत अंधश्रद्धा, पाखंड, अवडंबराची जळमटे पुसून मने लख्ख करणारे निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या ६७ व्या पुण्यतिथी सेवा सप्ताहात बुधवारी रात्री १२:२० वाजता हजारो अनुयायांच्या उपस्थितीत श्रद्धांजली वाहिली जाणार आहे.



'सुनी खबर की संत गाडगेबाबा हमको छोड़ गये, धडक भरी छाती में हमको पलभर तो नहीं होश रहे' या गीतातून बाबांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. गाडगेनगरस्थित बाबांच्या समाधीस्थळी १४ ते २१ डिसेंबर दरम्यान संस्थेचे प्रमुख विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात व व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांच्या आयोजनातून विविध सेवाभावी उपक्रम होत आहेत. बुधवारी रात्री ९ ते १० ऋषिकेश रेळे यांचे राष्ट्रीय कीर्तन, १० ते ११:४५ ह.भ.प. भरत रेळे यांचे सप्तखंजिरीवर प्रबोधन, रात्री ११:४५ ते १२ या वेळेत बापूसाहेब देशमुख महानिर्वाणाबद्दल माहिती देतील. रात्री १२:२० वाजता श्री बाबांचा स्मृतिदिन व पुण्यस्मरण श्रद्धांजली कार्यक्रम हजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

# पशूंची गणना केली जाते, मग जातिगत जनगणना का नाही? बच्चू कडू यांचा संघ आणि भाजपला सवाल

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**
**नागपूर:**



राज्यासह देशात पशूंची गणना केली जाते, मग जातिगत जनगणना का नाही, असा सवाल प्रहार पक्षाचे प्रमुख आणि सत्ताधारी पक्षातील आमदार बच्चू कडू यांनी विधानभवन परिसरात प्रसिद्धिमध्यमांशी बोलतांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपला केला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मंगळवारी जातिगत जनगणनेला विरोध केला होता. त्यावर विरोधकांनीही संघ आणि भाजपवर चांगलीच टीका केली होती. आता बच्चू कडू यांनी त्यावर भाष्य करतांना म्हटले की, जातिगत जनगणना व्हायलाच पाहिजे. त्याला आमचे (प्रहार पक्षाचे) समर्थन असल्याचे वेळोवेळी स्पष्ट केले आहे. त्याने कोणत्या समाजाचा लोकसंख्येत किती वाटा आहे, हे स्पष्ट होईल. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर जारांगे पाटील यांनी आता पुन्हा आंदोलन केल्यास मी कार्यकर्ता म्हणून त्यात सहभागी होईल. शेवटी मराठा समाजाला आरक्षण मिळून न्याय मिळायलाच हवा. विदर्भाच्या प्रश्नावर केवळ एक तास चर्चा होणे योग्य नाही. त्याने विदर्भाला न्याय मिळू शकत नसल्याचेही कडू म्हणाले.